advt24

MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.
ई मेल- mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२८६८८
संकेतस्थळ- www.mcaer.org

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४५२४/८५०/३४८९ दि. २७ नोव्हेंबर,२०२४

## कृषी विद्यापीठांतर्गत आचार्य पदवी प्रवेश सूचना २०२४-२५

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता खाली नमूद केलेल्या आचार्य पदवी अभ्यासक्रमास प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांकडून प्रवेश माहिती पुस्तिका २०२४-२५ मधील सूचनेनुसार ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे. अभ्यासक्रमाचे माध्यम इंग्रजी राहील.

**१. उपलब्ध विद्याशाखा**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | अ.क्र. | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| (१) | पीएच.डी. (कृषी) | (२) | पीएच.डी. (उद्यानविद्या) |
| (३) | पीएच.डी. (वनशास्त्र) | (४) | पीएच.डी. (मत्स्यविज्ञान) |
| (५) | पीएच.डी. (अन्न तंत्रज्ञान) | (६) | पीएच.डी. (जैवतंत्रज्ञान) |
| (७) | पीएच.डी. (कृषी अभियांत्रिकी) | (८) | पीएच. डी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) |

२. प्रवेश पात्रता, महाविद्यालय, प्रवेश क्षमता, आरक्षण, प्रवेश कार्यपध्दती इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची आचार्य पदवी प्रवेश माहिती पुस्तिका व ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याची सुविधा **दि. २९ नोव्हेंबर,२०२४** पासून **www.mcaer.org** व **https://phd.agrimcaer.in** या संकेतस्थळांवर उपलब्ध असेल. प्रवेशोच्छुकांनी सदर संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून घ्यावी. प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे आहे.

advt24

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-**

- उमेदवाराने **https://phd.agrimcaer.in** या संकेतस्थळाद्वारे **दि. १० डिसेंबर,२०२४ पर्यंत** ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. यानंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध नसेल.
- 'ऑन लाईन' प्रवेश अर्ज भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबंधित स्वयंसाक्षांकित कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- **प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.**
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड, नेट बँकीग किंवा डिजीटल पेमेंटद्वारे भरावे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्कः**

खुल्या प्रवर्गासाठी रु. २०००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. १०००/- (दिव्यांग, अनाथ) आणि (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*., सा.व शै.मा.व.*, आर्थिक दुर्बल घटक)
[आर्थिक दुर्बल घटक वगळता जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य. तसेच *उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

पात्र असलेल्या प्रवेशोच्छुक उमेदवारांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी उक्त संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेचे आकलन करून विहित वेळेत ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करावेत.

क्र. मकृप/शिक्षण-१/४५२४/८५०/३४८९
दिनांक- २७ नोव्हेंबर,२०२४

(रावसाहेब भागडे)
**महासंचालक**
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे